**CNR No**.– **MHSI080008902025**

## निशाणी ०१ वरील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायद्याच्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

## अर्जदाराच्या अर्जाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार श्रीमती विद्या महेश देसाई हे मु.पो. वारगाव ता.कणकवली येथे राहत आहे. अर्जदार हिचे पती महेश राघवेंद्र देसाई हे दि.२६/११/२०१९ रोजी मौजे वारगाव ता. कणकवली येथे मयत झाले आहेत. मयत महेश राघवेंद्र देसाई यांचे नावे चारचाकी वाहन क्र. MH–07–Q–7285 आणि दुचाकी वाहन क्र. MH–07–R–0438 नोंद आहे. सदर चारचाकी व दुचाकी वाहन अर्जदार यांचे नावाने हस्तांतरित करण्यासाठी अर्जदार यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्गनगरी, ओरोस येथे अर्ज केला असता, संबंधित कार्यालयाने क्रमांक/उपप्रापका/सिंधु/परिवहन/२०२५ जा.क्र.१३५४ च्या पत्राद्वारे सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले. मयत महेश राघवेंद्र देसाई हे विवाहित होते व त्यांचे पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदार हेच मयत महेश राघवेंद्र देसाई यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

३. न्यायालयाने अर्जदारामार्फत दैनिक प्रहार या वर्तमानपत्रामध्ये दि.२०/११/२०२६ रोजी निशाणी क्र.१० प्रमाणे जाहिर प्रगटन प्रसिद्ध करून हरकती मागविल्या होत्या. जाहिर प्रगटन प्रसिद्ध होऊनदेखील कोणत्याही व्यक्तीने कोणतीही हरकत घेतलेली नाही.

४. अर्जदार विद्या महेश देसाई यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. ११ प्रमाणे दिला आहे. त्यांनी पुराव्यात अर्जाशी सुसंगत अशी कथने केली आहेत. अर्जदाराच्या तोंडी पुराव्यास निशाणी क्र. १२ वरील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सिंधुदुर्गनगरी, ओरोस यांचे पत्र, निशाणी क्र.१८ येथे दुचाकी व निशाणी क्र. १३ येथे चारचाकी वाहनाची नोंदणी प्रमाणपत्र प्रत (RC Book), निशाणी क्र.१७ वरील महेश राघवेंद्र देसाई यांचे मृत्यू प्रमाणपत्र हा पूरक पुरावा आहे.

५. निशाणी क्र.१० चे जाहिर प्रगटन प्रसिद्ध करूनदेखील कोणत्याही व्यक्तीने अर्जास आक्षेप घेतलेला नाही. अर्जदार हिने दिलेला तोंडी पुरावा, दाखल केलेली कागदपत्रे व त्यावरील पुरावा यांवरून महेश राघवेंद्र देसाई यांचे दि.२६/११/२०१९ रोजी निधन झाले असल्याचे सिद्ध होते. तसेच ते विवाहित असल्याचे व अर्जदार विद्या महेश देसाई हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार यांस मयत यांच्या नावे असलेले चारचाकी व दुचाकी वाहन हस्तांतरित करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचेही पुराव्यावरून स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार हिने केलेला अर्ज सिद्ध झालेला असून अर्जदार या वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत.

सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार विद्या महेश देसाई हे मयत महेश राघवेंद्र देसाई यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र अपेंडीक्स – बी प्रमाणे देण्यात यावे.

४. अर्जदारांनी नियमाप्रमाणे लागणारी कोर्ट फी न्यायालयात जमा करावी.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.06.09 18:41:38 +0530

( शुभम जी. लटुरिया )

दिनांकः०९/०६/२०२६

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
कणकवली.